म.टा. ५.५.१.

# भाईंदरमध्ये बेकायदा फटाकेविक्री जोरात

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

मिरा-भाईंदर शहरामध्ये अक्षरशः नियम धुडकावून देत फटाकेविक्री केली जात असल्याचे दिसून येत आहे. संपूर्ण शहरात जागोजागी हे चित्र असून, त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. एकीकडे हे चित्र असताना केवळ विशिष्ट परिसराची जबाबदारी असणाऱ्या एका अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्याला

## केवळ एका अधिकाऱ्यावर कारवाई

करणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित जबाबदार अधिकाऱ्यांना पाठीशी घातले जात आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

मिरा-भाईंदर शहराच्या विविध भागात असणाऱ्या शासकीय व



खासगी अशा १२ मैदानांत फटाकेविक्री करण्यास मनपाकडून जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिवाळीच्या अनुषंगाने फटाकेविक्री संदर्भात उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्यानुसार नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रहिवासी क्षेत्रात फटाकेविक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यानंतरही रस्त्याच्या कडेला असणाऱ्या मोकळ्या जागेत, भर रस्त्यावर व गर्दीच्या ठिकाणी धोकादायकरित्या फटाकेविक्रीची दुकाने लावण्यात आहेत.

काही विक्रेत्यांना परवानगी देण्यात आली आहे. तर, काही दुकाने मात्र बेकायदेशीर पद्धतीनेच उभारली आहेत. या प्रकरणी आता प्रामुख्याने भाईंदर पूर्व भागाचीची जबाबदारी असणारे अग्निशामक अधिकारी सदानंद पाटील यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. नियम धुडकावून खाजगी जागेत फटाके विक्रीस ना हरकत दाखला दिल्याप्रकरणी ही नोटीस बजावण्यात आली आहे. केवळ एका अधिकाऱ्याला नोटीस बजावण्यात आल्यावरून कारवाईत दुजाभाव होत असल्याचे दिसत आहे.

म.टा. ५.५.१.

# मुलाचा आईवर चाकूहल्ला



**म. टा. वृत्तसेवा, भाईंदर**

आईच्या नावे मुंबईमध्ये असलेली सदनिका स्वतःच्या नावावर करण्यासाठी एका तरुणाने चक्क आईवरच प्राणघातक हल्ला केल्याची घटना भाईंदरमध्ये गुरुवारी घडली आहे. या प्रकरणी आरोपी तरुणाला नवघर पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे.

भाईंदर पूर्वेच्या नवघर भागात राहणाऱ्या ५२ वर्षीय कमला दंतानी यांची मुंबईतील दहिसर येथे एक सदनिका आहे. ही सदनिका स्वतःच्या नावे करावी, अशी मागणी त्यांचा ३० वर्षीय मुलगा संजय कमला यांच्याकडे अनेक दिवसांपासून करत आहे. मात्र, त्याला कमला या गोष्टीला नकार देत असल्याने दोघांमध्ये नेहमी वाद होत होते. गुरुवारी संजय आईच्या घरी आला होता. यावेळी त्याने रागातून आईवर एकामागून एक चाकूने वार केले. यात कमला गंभीर जखमी झाल्या. नंतर, त्याने घरातून पळ काढला. त्यानंतर उपचार करून नवघर पोलिस ठाण्यात त्यांनी तक्रार दाखल केली होती. त्यावरून गुन्हा दाखल करत संजयला अटक करण्यात आली आहे.

लोकसत्ता १३

# जप्त केलेल्या वाहनांच्या सुट्या भागांची चोरी

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** विविध गुन्ह्यांत नया नगर पोलिसांनी जप्त केलेल्या वाहनांच्या सुट्या भागांची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

मिरा- भाईंदर शहरातील पोलीस ठाण्यातून विविध गुन्ह्यात जप्त होणारी ही वाहने महापालिकेच्या मिरा रोड येथील आरक्षण क्रमांक २४८ या ठिकाणी ठेवली जातात.

मात्र उभ्या ठेवण्यात येणाऱ्या या वाहनांची तोडफोड करून सुट्या भागांची चोरी केली जात असल्याची तक्रार येऊ लागली आहे. यात २५ फेब्रुवारी २०२३ ते २८ ऑक्टोबर दरम्यान नया नगर पोलिसांनी उभ्या केलेल्या वाहनांमधील जवळपास दोन लाख रुपये किमतीच्या सुट्या भागांची चोरी झाली आहे. त्यामुळे नया नगर पोलीस ठाण्याचे साहाय्यक फौजदार रवींद्र शिंदे यांच्या तक्रारीवरून अनोळखी व्यक्तीविरोधात मिरा रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी ७.

लोकमत ३

लोकमत ५.५.३

## विजेचा दिवाळीत लपंडाव, नागरिक संतप्त

। वसई : दिवाळी सणाच्या गडबडीत महावितरणकडून वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने वसईतील नागरिक आणि व्यावसायिकांच्या आनंदावर विरजण पडले आहे.तांत्रिक बिघाडाचे कारण देत महावितरणकडून वारंवार आणि तासनतास वीज पुरवठा खंडीत केला जात आहे.त्यामुळे महावितरणचा कारभार खाजगी कंपनीकडे सोपवावा,अशी संतप्त मागणी नागरिकांकडून होत आहे.गणेशोत्सव,नवरात्रोत्सवान तरही महावितरणाकडून वारंवार विज पुरवठा खंडीत केला जात आहे.पुरवठा खंडीत झाल्यानंतर तासाभराने महावितरण कंपनीकडून ग्राहकांना अमुक बिघाड झाल्यामुळे अमुक तासाने विज पुरवठा सुरळीत केला जाईल असा संदेश पाठवला जातो.तोपर्यंत वर्क फ्रॉम होम किंवा घरी लघु उद्योग करणाऱ्यांचे वेळापत्रक बिघडलेले असते. सणाच्या काळात बाजारपेठा ग्राहकांनी गजबजलेल्या आहेत. खरेदीही मोठ्या प्रमाणात केली जात आहे.मात्र त्यावर वीज पुरवठा खंडित झाल्याचे विरजन पडत वारंवार महावितरणाचा कारभार बिघडत चालल्यामुळे हा कारभार आता खाजगी कंपनीकडे सोपवावा अशी मागणी केली जात आहे.

## नालासोपारा शस्त्रसाठा प्रकरणी तिघांना जामीन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : २०१८च्या नालासोपारा शस्त्रसाठा प्रकरणात, विशेष न्यायालयाने १४ पैकी तीन आरोपींची आता जामिनावर सुटका केली. या तिघांनीही सहा वर्षांचा तुरुंगवास भोगल्याने न्यायालयाने त्यांची जामिनावर सुटका केली. अनमोल काळे, शरद कळसकर आणि ऋषिकेश दावडीकर अशी या तिघांची नावे आहेत.

दहशतवादी कृत्यासंबंधी दिलेल्या टीपवरून एटीएसने सर्वप्रथम शरद कळसकरला अटक केली आणि त्याच्या चौकशीतून पथक इतरांपर्यंत पोहोचले. या गटाने हिंदू धर्माच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या प्रत्येकाला विरोध करण्याचा निर्णय घेतला होता. आरोपींची विचारधारा नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे, गौरी लंकेश, एमएम कलबुर्गी यांच्या हत्येसाठी अनुकूल आणि केएस भगवान यांच्या जिवावर बेतणारी ठरली आहे, असे पोलिसांचे म्हणणे आहे.



■ आरोपींविरुद्ध स्पष्ट पुरावे नाहीत. त्याशिवाय पुणे फेस्टिव्हल सुरळीत पार पाडले, त्यातच कोणत्याही आरोपीच्या कृत्यामुळे, भारताची एकता, अखंडता, सुरक्षा आणि सार्वभौमत्व कोणत्याही प्रकारे बाधित झाले आहे, असे काहीही रेकॉर्डवर नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने तिघांचा जामीन मंजूर केला.

## दारूच्या नशेत आत्महत्या



**मीरा रोड** : भाईंदर पश्चिमेच्या गांधीनगर स्मशानभूमीजवळ राहणारा मनोज मनोहर जाधव (वय ३८) याने दारूच्या नशेत घरातील छताच्या पंख्यास चादरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. तशा प्रकारची माहिती त्याचा भाऊ संतोष याने भाईंदर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. ही घटना २९ ऑक्टोबर रोजी घडली.

## अन्नातून विषबाधेने मृत्यू



**मीरा रोड** : मीरा रोडच्या पेणकरपाडा, पांडुरंगवाडी येथील नवसिंधुदुर्ग नगरमध्ये राहणार प्रतीक राजकुमार चुध (वय ३८) यांना खाण्या-पिण्यातून विषबाधा झाली. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले होते. २८ ऑक्टोबरला उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. तशी 'अकस्मात मृत्यू'ची नोंद काशिमीरा पोलिस ठाण्यात २९ ऑक्टोबर रोजी करण्यात आली आहे.

पुण्यनगरी ७

## वसईतील फटाक्यांच्या १६ दुकानांवर कारवाई

। वसई : परवानगी न घेता दुकाने थाटणाऱ्या वसईतील फटाक्यांच्या १६ दुकानांवर पोलीसांनी गुन्हे दाखल केले आहेत. वसई तालुक्याच्या नायगाव,नवघर-माणिकपूर, वसई,नालासोपारा आणि विरार या शहरांसह ग्रामीण भागातील मुख्य रस्त्यांसह गल्ली बोळातही फटाक्यांची दुकाने उभारण्यात आली आहेत.अग्निशमन,महापालिका,पोलीस यांची परवानगी न घेता त्यातील अधिकाधिक दुकाने सुरु आहेत.त्यापैकी १६ दुकानांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.नायगाव येथील ४, तुळींज येथील ९,माणिकपूर येथील २ आणि आचोळ्यातील १ अशा १६ फटाके विक्रेत्यांवर मंगळवारी आणि बुधवारी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. काही रस्त्यांवर थाटलेल्या या दुकानांमुळे वाहतूकीला अडथळा निर्माण होत असून,पादचारीही वैतागले आहेत.किमान गर्दीच्या वेळी तरी या दुकानांना बंदी घालण्यात यावी अशी मागणी जोर धरु लागली आहे.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी ५.

# नालासोपारा डम्पिंग ग्राऊंडवरील ४१ इमारतींना निवडणुकीचा दिलासा

## डिसेंबरमध्ये होणार कारवाई। दोन हजार कुटुंबांवर बेघर होण्याची टांगती तलवार

**। वसई:** डंम्पिग आणि एसटीपीसाठी आरक्षीत असलेल्या जागेवर भूमाफियांनी उभारलेल्या नालासोपारातील ४१ इमारतीवरील कारवाई निवडणूकीमुळे लांबणीवर पडली आहे.मात्र डिसेंबरमध्ये या इमारतींवर कारवाई होणार असल्याने दोन हजार कुटुंबावर बेघर होण्याची टांगती तलवार कायम आहे.

नालासोपारा पूर्वेकडील आचोळे येथील डम्पिंग ग्राऊंड आणि पाण्याच्या टाकीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या जागेवर भूमाफियांनी तब्बल ४१ बहुमजली इमारती उभारल्या होत्या.त्यातील फ्लॅट विकून त्यांनी सरकारी जागेवर आणि रहिवाशांच्या पैशावर डल्ला मारला.इतके होऊनही पालिका अधिकाऱ्यांनी या इमारतींकडे अर्थपूर्ण संबंधातून दुर्लक्ष केले.त्यामुळे नागरिकांच्या प्राथमिक सुविधा असलेले डम्पिं गाऊंड आणि पाण्याच्या टाक्यांपासून ते वंचित राहिले.



या ४१ इमारतींच्या अनेक तक्रारी आल्यावर तत्कालीन अधिकाऱ्यांनी आपले हात ओले करून,बदल्या करुन घेतल्या.

पालिका अधिकाऱ्यांच्या पाठींब्यामुळे या इमारती उभ्या राहिल्या असल्यातरी नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसगत झाली.या भूखंडाला लागून अजय शर्मा यांची जमीन होती,त्यावरही अतिक्रमण करण्यात आल्यामुळे शर्मा यांनी पालिकेत तक्रार करुन न्यायालयात दाद मागितली होती.तब्बल ११ वर्ष चाललेल्या या संघर्षानंतर गेल्या वर्षी महापालिकेच्या डी प्रभाग समितीवर नियुक्त झालेल्या सहाय्यक आयुक्ता विशाखा मोटघरे यांनी आचोळे पोलिस ठाण्यात याप्रकरणी २५ बिल्डरांविरुध्द गुन्हा दाखल केला होता.

नालासोपारा पूर्व वसंत नगरी येथील सर्व्हे क्रमांक २२ ते ३४ या जागेवरील डंपिंग ग्राऊंड आणि एसटीपी प्लांटसाठी ही जागा आरक्षित होती.२००८ मध्ये नगरसेवक सीताराम गुप्ता यांनी या जागेवर अतिक्रमण करुन काही बिल्डरांना जमीनी विकल्या.त्यानंतर मनपा अधिकाऱ्यांच्या संगनमताने याठिकाणी चार मजल्यांच्या ४० पेक्षा अधिक इमारती बेकायदा उभारण्यात आल्या.या इमारतींमध्ये शेकडो कुटुंबे राहत असून ते वर्षानुवर्षे करही भरत आहेत. डंपिंग आणि एसटीपी आरक्षणामुळे हे प्रकरण न्यायालयात गेले.त्यानंतर कोकण आयुक्त आणि पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी या इमारती रिकाम्या करण्याचे आदेश महापालिकेला दिले होते.डी प्रभाग समितीचे तत्कालीन प्र. सहायक आयुक्त रतेश किणी यांनीही ४१ इमारती रिकाम्या करण्याच्या नोटिसाही बजावल्या होत्या.मात्र वर्षानुवर्षे येथे राहणाऱ्या लोकांनी इमारती रिकाम्या करण्यास नकार दिला.आयुष्याची कमाई देऊन घेतलेले घर सोडून जायचे कुठे? अशी भूमिका त्यांनी घेतली होती. मात्र आता निवडणूकी पुरता या इमारतींना दिलासा मिळाला असला तरी निवडणूकी नंतर यावर कारवाई केली जाणार असल्याने लोकांना बेघर होण्याची भीती आहे.

Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी ४.

# मीरा-भाईंदरमध्ये सेल्फी पॉईंट ठरतोय धोकादायक

**। मीरा रोड :** मीरा भाईंदर महापालिकेने कोटयवधी रूपये खर्च करून शहरात सेल्फी पॉईंट बनवले आहेत. हे सेल्फी पॉईंट नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहेत.बुधवारी रात्री एक चार वर्षाची मुलगी खेळण्यासाठी गोल्डन नेस्ट येथील सेल्फी पॉईंट येथे गेली होती. खेळत असताना त्या मुलीला विजेचा शॉक लागल्याने मुलगी गंभीर जखमी झाली असून तिला जवळच्या खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

मीरा भाईंदर महापालिकेने दोन वर्षापूर्वी नगरसेवकांना खुश करण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च करून नगरसेवक निधीमधून शहरात विविध ठिकाणी सेल्फी पॉईंट उभारले आहेत. या सेल्फी पॉईंट आवश्यकता नसताना अनेक बियर बार, चौक व रस्त्याच्या कडेला उभारले आहेत. मोठा गाजावाजा करत सेल्फी पॉईंटचे उदघाटन करण्यात आले. परंतु या सेल्फी पॉईंटची देखभाल दुरूस्ती करण्याकडे महापालिकेने दुर्लक्ष केले आहे. या सेल्फी पॉईंटचे काम निकृष्ट दर्जाचे

## ४ वर्षाच्या मुलीला शॉक लागल्याने गंभीर जखमी



व कमी खर्चात केलेले आहे. सेल्फी पॉईंट उभारत असताना नागरिकांनी विरोध केला परंतु त्याकडे महापालिका व तत्कालीन नगरसेवक यांनी दुर्लक्ष केले. या सेल्फी पॉईंट येथे प्लास्टीकचे गवत टाकलेले आहे.त्या गवताखाली वायर टाकुन विद्युत रोषणाई केलेली आहे. हे वायर अनेक ठिकाणी तुटलेले आहेत. सेल्फी पॉईंटची देखभाल होत नसल्याने धोकादायक झाले आहेत. सेल्फी पॉईंट हे नागरिकांच्या जीवाला धोकादायक ठरत आहेत.

भाईंदर पूर्वेच्या गोल्डन नेस्ट चौकात महापालिकेने माजी नगरसेविका स्नेहा पांडे यांच्या नगरसेविका निधीतून सेल्फी पॉईंट उभारण्यात आलेला आहे. त्या बाजूलाच ओसवाल या विकासकाने सेल्फी पॉईंट उभारलेला आहे. या ठिकाणी आझाद नगर येथील रहिवासी असलेले मोहम्मद सलमान हे बुधवारी रात्री सव्वा दहाच्या सुमारास आपल्या दोन वर्षाच्या मुलाला व चार वर्षाच्या मुलीला फेरफटका मारण्यासाठी गोल्डन नेस्ट येथील चौकात घेउन आले होते. त्यांची मुले व इतर काही मुले त्या ठिकाणी खेळत होती. खेळत असताना अचानक त्यांच्या मुलीला शॉक लागुन त्या ठिकाणी लावण्यात आलेल्या ग्रिलला चिकटली तिच्या वडिलांनी तिला पाहिले असता तिला तत्काळ जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. मुलीची प्रकृती गंभीर असून ती सध्या कोमामध्ये असल्याचे तिच्या वडिलांनी सांगितले आहे. घटना घडल्यानंतर देखील महापालिका अधिकारी व ठेकेदार यांनी कोणतीही दखल घेतली नसून ठेकेदार व संबंधित मनपा अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी मुलीच्या पालकांनी केली आहे. तसेच या मुलीच्या उपचारासाठी महापालिकेने आर्थिक मदत करण्याची मागणी केली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता १३.

# वाहने धुण्यासाठी पिण्याचे पाणी

## शहरांत टंचाईच्या समस्येत लाखो लिटर पाण्याची नासाडी, कारवाईकडे दुर्लक्ष

लोकसत्ता प्रतिनिधी



### सांडपाण्याच्या नियोजनाचा अभाव

**वाहने धुतल्यानंतर त्यातून मोठ्या प्रमाणात सांडपाणी बाहेर पडते. काही ठिकाणी सांडपाण्याची विल्हेवाट योग्यरित्या लावली जात नाही. पाण्याचा वापर वाहने धुण्यासाठी केल्याने पाण्याची नासाडी होत आहे, त्याशिवाय हे पाणी साचून तेथे घाण निर्माण होते व डासांचा प्रादूर्भाव वाढून रोगराई पसरते. त्यामुळे महापालिकेने पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात भरारी पथक नेमून दंडात्मक कारवाईचा बडगा उगारावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.**

**वसई:** वसई, विरार शहरातील नागरिकांना अजूनही पिण्याचे पाणी मिळत नाही असे असताना वाहन धुलाई केंद्रावर (वॉशिंग सेंटर) वाहने धुण्यासाठी पिण्याचा पाण्याचा सर्रास वापर केला जात आहे. त्यामुळे दररोज लाखो लिटर पाण्याची नासाडी होत आहे. वसई-विरार महापालिकेकडून कारवाई होत नसल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

वसई, विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढू लागले आहे. वाहनांची संख्याही वाढल्याने मागील काही वर्षांत विविध ठिकाणच्या भागात वाहने धुण्यासाठी धुलाई केंद्र उभारली जात आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर होत असतो.अशी वाहने धुण्यासाठी कुपनलिका किंवा अन्य जलस्त्रोतांचा वापर करणे गरजेचे असताना काही ठिकाणी केंद्रावर वाहने धुण्यासाठी चक्क नागरिकांना पिण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या पाण्याचा वापर केला जात आहे.

शहराच्या विविध भागात सरार्सपणे असे बेकायदा धुलाई केंद्रे सुरू आहेत. महापालिकेकडून त्यांची तपासणी होत नसल्याने त्यांची संख्या वाढत आहे. एकीकडे पाणी मिळत नसल्याने नागरिकांना टँकरचे पाणी विकत घेऊन आपली तहान भागवावी लागत आहे. अशावेळी पिण्याचा पाण्याचा वापर वाहने धुण्यासाठी केला जात असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

शहराला एमएमआरडीएच्या सूर्या प्रकल्पातून अतिरिक्त १६५ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असला तरीही अजूनही शहरातील अनेक भागातील इमारती, गावपाड्यांत पाणी पोहोचलेले नाही. आजही वसई, विरारमधील जनतेला पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

सद्यस्थितीत शहराला प्रतिदिन ३२१ दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा केला जातो. ते पाणी अपुरे आहे. तरीसुद्धा केंद्रातून पिण्याचे पाण्याचा वाहने धुण्यासाठी वापर होत आहे. दरम्यान, आमच्याकडे अशा बेकायदा धुलाई केंद्राच्या तक्रारी आल्या आहेत. त्यांचा शोध घेऊन कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पालिकेच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांनी दिली.

म. टा. ८-५-५१.१

# वसईत बंद सदनिकेत आग

म. टा. वृत्तसेवा, वसई

विरारच्या ग्लोबल सिटी येथील कल्पवृक्ष या रहिवासी संकुलातील एका सदनिकेला भीषण आग लागल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. घर बंद असल्याने या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र संपूर्ण सदनिका जळून खाक झाली आहे.

विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी परिसरात कल्पवृक्ष रहिवासी गृहसंकुल आहे. या इमारतीत गुरुवारी रात्री एका बंद असलेल्या सदनिकेला आग लागली. ऐन दिवाळीत घडलेल्या या घटनेमुळे इमारतीमध्ये खळबळ उडाली होती. धुराचे व आगीचे मोठंमोठे लोळ पसरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अग्निशमन दलाने आगीवर नियंत्रण मिळवले.

Scanned with OKEN Scanner

पुढारी पा. नं. ५.

# मिरा-भाईंदरमधील भाजपचे तीन बंडखोर उमेदवारी मागे घेणार?

## मात्र उमेदवारीबाबत पक्षाच्या आदेशाची प्रतीक्षा

**भाईंदर : राजू काळे**

भाजपमधील तीन माजी नगरसेवकांनी बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज भरला असून ते आपली उमेदवारी कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नसल्याचा दावा ते करीत आहेत. या बंडोबांची लढत नेमकी कोणासोबत आहे, हे जरी ते उघडपणे बोलत नसले तरी पक्षाकडून आदेश आल्यास ते आपली उमेदवारी मागे घेतील, असा अंदाज बांधला जात आहे. यामुळे त्यांची उमेदवारी पक्षाच्या आदेशावर अवलंबून असल्याचे तूर्तास स्पष्ट झाले आहे.

भाजपच्या या तीन बंडखोर माजी नगरसेवकांमध्ये हंसुकूमार पांडे, सुरेश खंडेलवाल व चंद्रकांत मोदी यांचा समावेश आहे. मोदी हे माजी जिल्हाध्यक्ष तथा यंदाच्या निवडणुकीतील महायुतीचे अधिकृत उमेदवार नरेंद्र मेहता यांचे विरोधक ॲड. रवी व्यास यांचे समर्थक मानले जातात. सुरेश खंडेलवाल हे देखील व्यास यांचेच समर्थक मानले जात असले तरी ते अधूनमधून गिता जैन यांच्या गर्दीत दिसून येतात. यावरून खंडेलवाल हे मेहता विरोधक असल्याचेच बोलले जात असून हंसुकूमार पांडे हे सुद्धा मेहता यांचे विरोधकच मानले जातात. निवडणूक जाहीर होण्यापूर्वी व्यास हे देखील उमेदवारी मिळविण्याच्या स्पर्धेत होते. मात्र निवडणूक जाहीर झाल्यानंतर त्यांनी उमेदवारी मिळविण्यासाठी गीता जैन व नरेंद्र मेहता यांच्यात लागलेल्या स्पर्धेमुळे उमेदवारीचा हट्ट सोडला. मेहता यांना उमेदवारी जाहीर होताच व्यास यांचा मेहता यांच्यावरील विरोध मावळून त्यांनी मेहता यांना विजयी करण्याचे आवाहन आपल्या समर्थकांना केले आहे. यावरून व्यास समर्थक माजी नगरसेवक सुरेश खंडेलवाल व चंद्रकांत मोदी हे आपले उमेदवारी अर्ज मागे घेतील, अशी अटकळ केली जात आहे. यातील खंडेलवाल आपल्या मागे विविध संस्थांसह तसेच इतर समाजातील मतदार असल्याचा दावा करीत त्यांच्या आग्रहाखातर आपण उमेदवारी अर्ज भरल्याचा दावा करीत आहेत.

पक्षाकडून उमेदवारी मागे घेण्याबाबत सतत मेसेज येत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र पाठीशी असलेल्या मतदारांच्या आग्रहामुळे तूर्तास उमेदवारी मागे घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. मोदी यांनी पक्षाकडून जो आदेश येईल, तो मानणार असल्याचे स्पष्ट करीत त्यांनी मेहता यांच्यासाठीच काम करणार असल्याचे संकेत यातून दिले आहेत. हंसुकूमार पांडे मात्र कोणत्याही परिस्थितीत आपली उमेदवारी मागे घेण्याच्या मनःस्थितीत नसल्याचे त्यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पांडे हे एक व्यावसायिक असून ते मिरा-भाईंदर स्टील असोसिएशनचे उपाध्यक्ष देखील आहेत.

---

सामना पा. नं. ५.

**▌निवडणूक आयोगाचे 'लाडक्या उमेदवारा'ला अभय ▌आक्षेप घेऊनही अर्ज पात्र**

# भाजपच्या मेहतांनी बलात्काराचा गुन्हा लपवला; पोलीस संरक्षणाचे पैसेही लटकवले



भाईंदर, दि. १ (सा. वा.) - मुख्यमंत्र्यांची लाडकी बहीण, लाडका अधिकारी, लाडका ठेकेदार या खोके सरकारच्या योजनांपाठोपाठ आता निवडणूक आयोगाने लाडक्या उमेदवारांसाठी अभय योजना सुरू केली आहे. ठाणे शहर मतदारसंघापाठोपाठ या योजनेचा प्रत्यय आता मीरा-भाईंदर मतदारसंघातही आला आहे. या मतदारसंघातील भाजपचे वादग्रस्त उमेदवार नरेंद्र मेहता यांनी आपल्या शपथपत्रामध्ये बलात्काराचा गुन्हा लपवला आहे. त्यांच्याकडे पोलीस संरक्षणाची सुमारे ८९ लाख रुपयांची थकबाकी असताना आपल्याकडे शासनाची कोणतीच देणी राहिलेली नाही, असे त्यांनी खोटे लिहून दिले आहे. त्यांचा हा कारनामा उघडकीस आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज पात्र ठरवला आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून नरेंद्र मेहतांना दोन सशस्त्र पोलीस संरक्षणासाठी पुरवले जात आहेत, परंतु या पोलीस संरक्षण दिल्याचे शुल्क मात्र मेहतांनी १२ जून २०२३ पासून भरलेले नाही. सप्टेंबर २०२४ पर्यंत या थकबाकीची रक्कम तब्बल ८९ लाख १४ हजार ७०० रुपये इतकी झालेली आहे. भाजपने नरेंद्र मेहता यांना मीरा-भाईंदर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. उमेदवारी अर्ज भरताना मेहता यांनी कोणतीही शासकीय देणी देणे प्रलंबित नाही असे शपथपत्राद्वारे सांगितले आहे. एकीकडे पोलीस संरक्षणाचे तब्बल ८९ लाख रुपये थकबाकी असताना त्यांनी शपथपत्रात खोटी माहिती दिली. तसेच त्यांच्यावर दाखल गुन्हे याचा तपशील त्यांनी जाणीवपूर्वक शपथपत्रात दिला नाही. त्यांनी त्यांच्यावरील दाखल गुन्ह्यात बलात्काराचे कलम लपवले. तसेच काही गुन्हे व कलमाची माहिती दिली नाही असा आक्षेप उमेदवारी अर्जाच्या पडताळणी आणि छाननीच्या वेळी ॲड. राहुल राय आदींनी घेतला होता, परंतु निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे यांनी जाणीवपूर्वक मेहतांचा उमेदवारी अर्ज बाद होऊ नये म्हणून त्यांना संरक्षण देत कायदे नियम आणि न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून मेहतांच्या उमेदवारी अर्ज वैद्य ठरवला आहे.

**ढोलताशे**

**विधानसभा निवडणूक २०२४**

### ▌सुरक्षा शाखेला कल्पना आहे

माजी आमदार नरेंद्र मेहता यांना दिलेल्या पोलीस संरक्षणाच्या थकबाकीबाबत पोलीस आयुक्तालयातील सुरक्षा शाखेला कळवले आहे. त्याची माहिती सांगणे हे सुरक्षा शाखेचे काम आहे, थकबाकीवर मी भाष्य करू शकत नाही, अशी प्रतिक्रिया नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक धीरज कोळी यांनी व्यक्त केली आहे.

### ▌अधीकाऱ्यांची उडवाउडवी

नवघर पोलिसांनी सुरक्षा शाखेला काय अहवाल पाठवला हे त्यांना विचारून घ्या, आपण नवीन आलो आहोत याची माहिती वरिष्ठांची परवानगी घेऊन देतो. थकबाकीबाबत मला कोणतीच कल्पना नाही, अशी उडवाउडवीची उत्तरे देऊन सुरक्षा शाखेचे पोलीस निरीक्षक यांनी या प्रकरणावर बोलण्याचे टाळले आहे.

Scanned with OKEN Scanner

नवभारत पु-पा-2.

# साइकिल पर स्टंट करना पड़ा भारी

## दीवार से टकरा कर युवक की मौत, दुर्घटना सीसीटीवी में कैद

■ भाईंदर, (सं). साइकिल से स्टंट करना एक युवक को बहुत भारी पड़ा, साइकिल को बैलेंस नहीं कर पाने से दीवार से टकरा कर उसकी दर्दनाक मौत हो गई. यह पूरी दुर्घटना एक दुकान में लगे सीसीटीवी में कैद हो गई. दरअसल, भाईंदर के गीता नगर फेस-3 निवासी नीरज राजेश कुमार यादव (16), पिछले सोमवार को सुबह 11 बजे के दौरान साइक्लिंग करने के लिए घोड़बंदर गांव स्थित घोड़बंदर किला परिसर में गया हुआ था. वापसी में उतरते समय तेज ढलान के कारण उसका साइकिल पर से नियंत्रण छूट गया और नीचे एक इमारत की दीवार और गेट से टकरा गया. उसके सिर पर गहरी चोट लगी और दुर्घटना स्थल पर ही उसकी दर्दनाक मौत हो गई. इस प्रकरण में काशीगांव पुलिस ने आकस्मिक मृत्यु का मामला दर्ज किया है.



# नालासोपारा में युवक ने फांसी लगाकर दी जान

नालासोपारा. प्रगति नगर स्थित ओस्तवाल बिल्डिंग में अज्ञात कारणों से सुनील कुमार जायसवाल नामक 32 वर्षीय युवक ने पंखे से लटककर जान दे दी. घटना की सूचना पर पहुंची पुलिस ने शव का पंचनामा कर पोस्टमार्टम के लिए भेज दिया. आत्महत्या का कारण क्या है, इसकी जांच पुलिस द्वारा की जा रही है. स्थानीय नागरिकों ने बताया कि, सुनील कुमार जायसवाल ने दो वर्ष पूर्व ही ओस्तवाल नगरी बिल्डिंग नंबर 12 के ग्राउंड फ्लोर के फ्लैट नंबर 03 को खरीदा था और अपनी पत्नि व दो छोटे मासूम बच्चों के साथ रहता था. सुनील की नागिनदास में फोटो स्टेट की दुकान है. गुरुवार की रात वह किसी कारण से कहीं बाहर गया था, सुबह 4 बजे वापस आया था. उसके बाद सुबह जब उसकी पत्नि उठी तो देखा कि, उसका पति पंखे से झूल रहा था. इसके बाद उसने शोर मचाना शुरू कर दिया, जिसे सुन आसपड़ोस के लोग जमा हो गए.

H.BT.9.

# यौन शोषण के आरोप में सिक्युरिटी गार्ड गिरफ्तार

## स्कूल के पास खेल रही थी नाबालिग लड़की

■ अमित तिवारी, मीरा-भाईंदर

**भाईंदर पूर्व** में बदलापुर यौन शोषण जैसी ही घटना सामने आई है। आरोप है कि स्कूल के सिक्युरिटी गार्ड ने एक 8 वर्षीय लड़की का यौन शोषण किया गया है। नवघर रोड पुलिस ने भारतीय दंड संहिता और पॉक्सो के तहत मामला दर्ज कर आरोपी को गिरफ्तार कर लिया है।

घटना गुरुवार शाम 6 बजे की है। पीड़ित लड़की स्कूल के पास ही एक इमारत में रहती है। स्कूल दिवाली की वजह से बंद है। पीड़ित लड़की स्कूल के पास ही अपने इमारत परिसर में खेल रही थी। आरोपी ने उसे पटाखे देने के बहाने बुलाया और स्कूल के एक कमरे में उसका यौन शोषण किया। इस दौरान लड़की रोने लगी और वहां से किसी तरह भाग निकली। पीड़ित लड़की ने अपने माता-पिता को पूरी बात बता दी। इसके बाद उन्होंने पुलिस में शिकायत दर्ज कराई।

27 वर्षीय आरोपी सिक्युरिटी गार्ड झारखंड का निवासी है। वह कुछ महीने पहले ही स्कूल में नौकरी पर आया था। आरोपी युवक का पुलिस वेरिफिकेशन नहीं हुआ था।

**'स्कूलों और कर्मचारियों का वेरिफिकेशन हो'**

बदलापुर के बाद भाईंदर में हुई इस तरह की घटना से लोग स्तब्ध हैं। शहर के सामाजिक संगठन ने इसे गंभीरता से लिया है। स्वर्गीय इंद्रबहादुर सिंह लाइब्रेरी चलाने वाले सामाजिक संगठन अभियान के सदस्य संतोष दीक्षित ने कहा है कि शहर के सभी स्कूलों और उनके कर्मचारियों का पुलिस वेरिफिकेशन होना चाहिए। उन्होंने कहा कि यह एक गंभीर विषय है।

AI Image



### सुस्त पड़ा प्रशासन

**बदलापुर** स्कूल में यौन शोषण की घटना के बाद मीरा-भाईंदर में भी मनपा और पुलिस प्रशासन हरकत में आ गया था। आनन-फानन में प्रशासन ने स्कूलों में काम करने वाले कर्मचारियों के वेरिफिकेशन की प्रक्रिया शुरु कर दी थी, लेकिन अब उसमें सुस्ती आ गई है। अधिवक्ता राजकुमार मिश्रा ने कहा कि स्कूल में सुरक्षा के मुद्दे पर गंभीरता से काम करने की जरूरत है। मिश्रा ने कहा कि इस तरह की घटनाओं की पुनरावृत्ति बहुत चिंता की बात है।

नवभारत पु-पा-4

### आपत्तिजनक पोस्ट करने वालों को DCP की चेतावनी

# MBVV पुलिस और EC की सोशल मीडिया पर पैनी नजर

■ मीरा-भाईंदर, (सं). राज्य में विधानसभा चुनाव 2024 की आदर्श आचार संहिता लागू है. चुनाव के दौरान कोई अप्रिय घटना घटित नहीं हो इसके लिए मीरा-भाईंदर,वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत के सभी पुलिस थाने सतर्क और मुस्तैद हैं. साथ ही सोशल मीडिया पर किए जाने वाले पोस्ट पर भी पुलिस और चुनाव आयोग की पैनी नजर है. जोन-1 के डीसीपी प्रकाश गायकवाड ने सोशल मीडिया पर आपत्तिजनक पोस्ट या किसी पोस्ट को वायरल करने से बचने की सलाह दी है, अन्यथा ऐसे कृत्य करने वालों के खिलाफ आपराधिक मामले दर्ज किए जाने की चेतावनी भी दी है. चुनाव के दौरान सोशल मीडिया के व्हाट्सएप, फेसबुक, एक्स हैंडल, इंस्टाग्राम, शेयरचैट, टेलीग्राम, गुगल, यूट्यूब आदि साइट्स के माध्यम से झूठी जानकारी देना, अफवाह फैलाना, गलत तरीके से जानकारी प्रस्तुत करना, किसी उम्मीदवार को फायदा पहुंचे ऐसे प्रचार करना, गिफ्ट कूपन वितरण करना, उम्मीदवार को जिताने से संबंधित आदि पोस्ट करने वालों पर आपराधिक मामले दर्ज किए जाने की चेतावनी दी गई है. चुनाव के दौरान सोशल मीडिया का दुरुपयोग नहीं करने का आह्वान डीसीपी गायकवाड ने किया है.



*नागरिकों को केवल चुनाव के दौरान ही नहीं, वरन कभी भी सोशल मीडिया पर धार्मिक भावनाओं को ठेस पहुंचाने वाला कोई भी टेक्स्ट या फोटो पोस्ट नहीं करना चाहिए. देश की एकता और अखंडता में बाधा पहुंचे, ऐसी कोई भी सांप्रदायिक पोस्ट नहीं करनी चाहिए. आपत्तिजनक सामग्री, पोस्ट, अफवाहें फैलाने, जान से मारने की धमकी देने, अश्लील सामग्री, चाइल्ड पोर्नोग्राफी आदि पोस्ट करते हैं और जो उन पोस्ट को साझा करते हैं, दोनों को दोषी माना जाता है. इनमें से कुछ अपराधों के लिए कारावास की सजा हो सकती है, जबकि साइबर अपराध के लिए 3 वर्ष से लेकर आजीवन कारावास तक की सजा और एक लाख से दस लाख रुपये तक का जुर्माना हो सकता है.*

*- प्रकाश गायकवाड, DCP, जोन - 1, MBVV पुलिस*

Scanned with OKEN Scanner

पुण्य नगरी

# समाजमाध्यमांवरील आक्षेपार्ह पोस्टवर गुन्हे दाखल करणार

## मीरा–भाईंदर पोलिसांची करडी नजर, प्रत्येकाला सावधगिरी बाळगण्याचा सल्ला

**। मीरा रोड :** राज्यात विधानसभा निवडणुकीची पार्श्वभूमीवर सोशल मीडियातून समाज माध्यमांवर कुठलीही पोस्ट करताना किंवा प्रतिक्रिया देताना तसेच पक्षाचा अथवा उमेदवारांचा प्रचार करताना प्रत्येकाने सावधगिरी बाळगावी. आदर्श आचारसंहिता काळात आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यांवर निवडणूक आयोगासह मीरा भाईंदर पोलिसांची करडी नजर ठेवली जाणार आहे. आक्षेपार्ह पोस्ट समाज माध्यमावर व्हायरल करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात येईल असा इशारा पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिला आहे.

राज्यात निवडणूका विधानसभा जाहीर झाल्यापासून निवडणूकीची आदर्श आचारसंहिता सुरू आहे. या काळात सोशल मीडियाचा वापर करून व्हॉट्सअप, फेसबुक, एक्स हँडल, गुगल, शेअरचॅट व इन्स्टाग्राम आणि इतर यासारख्या माध्यमातून खोटी माहिती देणे, अफवा पसरवणे, समाज माध्यमांवर चुकीच्या पद्धतीने माहिती पोस्ट करणे, तसेच निवडणूक काळात एखाद्या उमेदवाराचा प्रचार करणे व



गिफ्ट वाटप करणे, तसेच उमेदवाराला मतदान करा तसेच त्यांना निवडून द्या असे प्रचार साहित्य किंवा असा काही प्रकार केल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. निवडणूक काळात समाजमाध्यमांचा गैरवापर करू नये, असे आवाहन पोलीस उपायुक्त गायकवाड यांनी केले आहे.

नागरिकांनी केवळ निवडणुकीच्या काळातच नव्हे तर कधीही समाज माध्यमांवर धार्मिक भावना दुखावणारा मजकूर, फोटो पोस्ट करू नये. देशाच्या एकतेला बाधा येईल असा कोणत्याही संप्रदाय विरोधातला मजकूर, अफव पसरवणारा, जीवे मारण्याच धमकी देणारा, अश्लील मजकू चाईल्ड पोर्नोग्राफी आदी पोस् करणारा आणि ती पोस्ट शेअ करणारा अशा दोघांनाह दोषी ठरवले जाते. यापैक काही गुन्ह्यांसाठी तुरुंगवास सायबर गुन्ह्यासाठी ३ वर्षे आजीवन तुरुंगवास, तसे एक लाख ते १० लाखा पर्यंत दंड होऊ शकतो, याकडे सुद्ध गायकवाड यांनी लक्ष वेधल आहे. तसे करणाऱ्यांवर गुन् दाखल करण्यात येतील, अ सांगितले आहे.

Palghar Edition
Nov 01, 2024 Page No. 01
Powered by: erelego.com

Scanned with OKEN Scanner

नवभारत

### आपतिजनक पोस्ट करने वालों को DCP की चेतावनी

# MBVV पुलिस और EC की सोशल मीडिया पर पैनी नजर

■ मीरा-भाईंदर, (सं). राज्य में विधानसभा चुनाव 2024 की आदर्श आचार संहिता लागू है. चुनाव के दौरान कोई अप्रिय घटना घटित नहीं हो इसके लिए मीरा-भाईंदर,वसई विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत के सभी पुलिस थाने सतर्क और मुस्तैद हैं. साथ ही सोशल मीडिया पर किए जाने वाले पोस्ट पर भी पुलिस और चुनाव आयोग की पैनी नजर है. जोन-1 के डीसीपी प्रकाश गायकवाड ने सोशल मीडिया पर आपत्तिजनक पोस्ट या किसी पोस्ट को वायरल करने से बचने की सलाह दी है, अन्यथा ऐसे कृत्य करने वालों के खिलाफ आपराधिक मामले दर्ज किए जाने की चेतावनी भी दी है. चुनाव के दौरान सोशल मीडिया के व्हाट्सएप, फेसबुक, एक्स हैंडल, इंस्टाग्राम, शेयरचैट, टेलीग्राम, गुगल, यूट्यूब आदि साइट्स के माध्यम से झूठी जानकारी देना, अफवाह फैलाना, गलत तरीके से जानकारी प्रस्तुत करना, किसी उम्मीदवार को फायदा पहुंचे ऐसे प्रचार करना, गिफ्ट कूपन वितरण करना, उम्मीदवार को जिताने से संबंधित आदि पोस्ट करने वालों पर आपराधिक मामले दर्ज किए जाने की चेतावनी दी गई है. चुनाव के दौरान सोशल मीडिया का दुरुपयोग नहीं करने का आह्वान डीसीपी गायकवाड ने किया है.



*नागरिकों को केवल चुनाव के दौरान ही नहीं, वरन कभी भी सोशल मीडिया पर धार्मिक भावनाओं को ठेस पहुंचाने वाला कोई भी टेक्स्ट या फोटो पोस्ट नही करना चाहिए .देश की एकता और अखंडता में बाधा पहुंचे,ऐसी कोई भी सांप्रदायिक पोस्ट नहीं करनी चाहिए . आपतिजनक सामग्री, पोस्ट, अफवाहें फैलाने , जान से मारने की धमकी देने, अश्लील सामग्री, चाइल्ड पोर्नोग्राफी आदि पोस्ट करते हैं और जो उन पोस्ट को साझा करते हैं, दोनों को दोषी माना जाता है . इनमें से कुछ अपराधों के लिए कारावास की सजा हो सकती है, जबकि साइबर अपराध के लिए 3 वर्ष से लेकर आजीवन कारावास तक की सजा और एक लाख से दस लाख रुपये तक का जुर्माना हो सकता है .*

*- प्रकाश गायकवाड, DCP,*
*जोन - 1, MBVV पुलिस*

Mumbai plus Edition
Nov 02, 2024 Page No. 3
Powered by: navbharatlive.com

Scanned with OKEN Scanner

THE FREE PRESS JOURNAL pg-02

# 28 ACPs, including 15 from Mumbai, shunted

**Poonam Apraj**
MUMBAI

Following the Election Commission's orders, the Home Department has transferred 28 Assistant Police Commissioners in the state police force. Among them, 17 officers are from the Mumbai Police. The transfer orders were issued on Wednesday evening by Sandeep Dhakane, Deputy Secretary of the Home Department, directing the transferred officers to immediately assume their new postings.

Notable transfers include Assistant Police Commissioner Yogesh Ashokrao Gawde from Navi Mumbai to Mumbai, Kishore Vishwanath Gayke from Dahisar division to Navi Mumbai, Suhas Pandurang Kamble from Kherwadi division to the Nashik Maharashtra Police Academy as Deputy Superintendent, and Ravindra Shankarrao Dalvi from Mulund division to Marol as Deputy Superintendent of Police Training Division.

Additional transfers include Sanjay Damodar Dahake from Deonar division to Khandala Police Training Center and Mahesh Narayan Mugutrao from Santacruz division to the Nashik Crime Investigation Training Center.

OVALA-MAJIWADA ASSEMBLY SEAT

# Jolt to MVA as 3 ex-MBMC corporators join Shiv Sena

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

In yet another major setback to the Shiv Sena (UBT) and Maha Vikas Aghadi (MVA), three former corporators in the Mira Bhayandar Municipal Corporation (MBMC) joined Eknath Shinde-led Shiv Sena ahead of the assembly elections scheduled to be held on November 20.

The corporators include Jayantilal Patil (Sena UBT), Sunita Patil (Congress) and Arvind Thakur who along with their supporters joined the Shiv Sena (Shinde camp) in the presence of sitting legislator Pratap Sarnaik and city chief Raju Bhoir on Thursday.

"We are inspired by chief minister- Eknath Shinde and our legislator Pratap Sarnaik who have played a crucial role in the development of the twin-city, we wanted to support the both in their future endeavours," said Patil as the other two-party hoppers echoed similar views.

The Ovala-Majiwada constituency is all set to witness a straight fight between Sarnaik (who has wrestled the constituency for three consecutive terms with a thumping majority) and Shiv Sena (UBT) candidate Naresh Manera.

"The entry of these former corporators and their supporters will add more strength to our party in the region," said an optimistic Sarnaik.

Scanned with OKEN Scanner

THE FREE PRESS JOURNAL Pag - 02

## 23 candidates pass scrutiny

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

Nomination papers of six (some had filed multiple forms) aspiring contestants have been rejected during the scrutiny process conducted by electoral officers for the Mira Bhayandar assembly constituency on Wednesday. With the rejections, 23 candidates have remained in the fray.

While the fight for the seat will be among 23 remaining candidates including 14 independents, a fierce triangular contest between Maha Vikas Aghadi (MVA) candidate Muzaffar Hussain (Congress), Mahayuti's Narendra Mehta (BJP) and sitting legislator Geeta Jain (Independent) is on the cards.

A glance on the Election Commission of India's website reveals that apart from a sitting and two former legislators, ex-deputy president of the municipal council and three ex-municipal corporators have filed their nominations.

**FIGHT FOR PRIDE | BJP leaders have urged support for Amit Thackeray, but Sarvankar has filed his nomination for Mahim Assembly on Shiv Sena ticket**

# BJP-MNS's lovefest leads to rumours of secret agreement

**Prajakta Pol**
MUMBAI

As the Maharashtra Assembly elections draw near, the growing rapport between MNS chief Raj Thackeray and BJP leaders has become a topic of discussion. BJP Maharashtra president Chandrashekhar Bawankule recently praised Raj Thackeray's stance, despite the MNS fielding candidates in over 100 seats. Notably, MNS chief Raj Thackeray's son Amit Thackeray is making his electoral debut from Mahim against Shiv Sena's Sada Sarvankar. Despite these developments, Bawankule remarked, "Maharashtra needs Raj Thackeray's vision."


Amit Thackeray


Sada Sarvankar

A few days ago, Raj Thackeray declared that the next Chief Minister would be from the BJP, specifically mentioning Devendra Fadnavis. Bawankule's recent statement has fueled speculation about a potential internal alliance between the BJP and MNS.

During the Lok Sabha elections, the MNS offered unconditional support to the Mahayuti; however, for the current Assembly election, the MNS has fielded candidates in over 100 seats, positioning them against both the ruling BJP and the opposition Maha Vikas Aghadi (MVA).

BJP leaders have even urged support for Amit Thackeray, but Sarvankar has filed his nomination for the Mahim Assembly on behalf of Shiv Sena, undeterred by BJP efforts to persuade him to withdraw.

Expressing his determination, Sarvankar stated, "I am contesting the Assembly election. I have made it clear that I will not withdraw."

According to sources, Sarvankar recently met with Chief Minister Eknath Shinde, who reportedly advised him to withdraw his nomination and assured him an opportunity in the Legislative Council if he obliged. However, Sarvankar remains steadfast for now. It will be interesting to see if he eventually withdraws or chooses to rebel.

**Mahim Candidates**

AMIT THACKERAY (MNS)

SADA SARVANKAR (Shiv Sena)

MAHESH SAWANT Shiv Sena (UBT)

**2,25,373** Total voters

**1,12,638** Male

**1,12,657** Female

**78** Trans

Scanned with OKEN Scanner